महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/157/ पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 दिनांक : 19/04/2025

# 1)गंभीर दुखापत :–

**1)इतवारा :–** दिनांक 17.04.2025 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **आजम हॉटेल देगलुरनाका, नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1. मजहर 2. शेख अदनान शेख सोहेल यांनी संगणमत करून जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीचा भाऊ असलमखॉन याला डाव्या हातावर व डाव्या बरगडीवर जोरात मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी शहनाज बेगम भ्र. मुजम्मीलखॉन, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दर्गापूरा अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातुर** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 136/2025 कलम 118(2),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1204 दुराणी, मो.नं.** 9823394360 हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** दिनांक 15.04.2025 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **मारोती मंदिराचे समोर मौजे धनगरवाडी ता. देगलूर येथे** यातील आरोपी नामे 1. बालाजी लक्ष्मण पाडगे 2. लक्ष्मण रामा पाडगे 3. मारूती लक्ष्मण पाडगे 4. चंद्रकलाबाई लक्ष्मण पाडगे सर्व रा. धनगरवाडी ता. देगलूर यांना फिर्यादीने तुम्ही माझी मुलगी बद्दल तिचे नवऱ्यास ती अशी तशी वागते म्हणून का सांगितलात म्हणुन विचारले असता आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस काठीने डोक्यात हाताच्या बोटावर मारून बोट फ्रॅक्चर केले व फिर्यादीचा मुलगा भांडण सोडविण्यास गेला असता आरोपीतांनी त्यास मारून जखमी केले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गंगाराम मालगोंडा बाळरामाचे, वय 75 वर्षे, व्यवसाय शेती रा. धनगरवाडी ता. देगलूर जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 94/2025 कलम 118(2),181(1),115(2),352,351(3),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो.नं. 7776067477** हे करीत आहेत.

# 2)अवैध रेती चोरी :–

**लोहा :–** दिनांक 17.04.2025 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **मौजे संगुचीवाडी येथे मेन रोडवर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे पुंडलिक माणिकराव जाधव, वय 55 वर्षे रा. आंबेसांगवी ता. लोहा जि. नांदेड याने आपले ताब्यातील एक हायवा टिपर क्रमांक एमएच–24/एयु–4627 किंमती 18,00,000/–रूपयाचा मध्ये 05 ब्रास रेती किंमती 25,000/–रूपयाची असा एकुण 18,25,000/–रूपयाचे मुद्देमालासह चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/284 नारायण किसनराव कदम, पो स्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 111/2025 कलम 303(2),281 बीएनएस–2023 कायदा सह कलम 48(7) म.ज.म. अधिनयम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2483 साखरे, पो. स्टे. लोहा, मो.क्रं. 9823015483** हे करीत आहेत.

# 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :– मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते. त्या अंतर्गत** दिनांक 18.04.2025 रोजी 19.35 वा. चे सुमारास, **जयभिमनगर नाल्याजवळ नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे सूरज विकास सदावर्ते, वय 19 वर्षे व्यवसाय मजुरी रा. जनता कॉलनी नांदेड यांने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल (अग्नीशस्त्र) किंमती 20,000/–रूपयाचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/793 उमेश प्रकाश आकोसकर, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 166/2024 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री उमेश कदम, मो.क्रं. 8308517710** हे करीत आहेत.

# 4)जुगार :–

**इतवारा :–** दिनांक 18.04.2025 रोजी 15.15 वा. चे सुमारास, **सिटीझन जिमच्या बाजुला सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1.शंकर मदनलाल रोत्रे वय 35 वर्ष रा. गवी गल्ली पुर्णा जि. परभणी 2. विश्वनाथ नागनाथ चव्हाण वय 52 वर्षे रा. मंडई इतवारा, नांदेड हे विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण ओपन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3150/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3373 बाजीराव शाहुराज मुदगडे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे इतवारा गुरन 135/2025 कलम 12(अ)** म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1204 दुराणी, मो. नं. 9823394360** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबिशन :–

**कुंटूर :–** दिनांक 18.04.2025 रोजी 14.20 वा. चे सुमारास **मौजे बळेगाव शिवारात ब्रिजच्या लगत टिन पत्राचे शेडमध्ये ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे पंडितराव गणपतराव पाटील, वय 48 वर्षे रा. बळेगाव ता. देगलूर जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 3570/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/रामचंद्र तुकाराम पवार, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 87/2025 कलम 65(ई) म. प्रो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2485 पवार, मो.नं. 9637706877** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड